Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# नाशिक जिह्यातील कळवण तालुक्यातील जमीन वापराचे भौगोलिक विश्लेषण - एक अभ्यास

**प्रा . पवार एस.एस.** **प्रा .वाय .बी. जाधव**

**कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय.सटाणा**

**ता.बागलाण, जि. नाशिक (महाराष्ट्र)**

**सारांश -**


कळवण तालुका हा एक नाशिक जिल्यातील महत्वाचा आदिवासी तालुका असून या तालुक्यातील सर्वसाधारण जमिनीचा वापर कसा झाला आहे याचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या तालुक्यात शेतीच्या लागवडी खालील जमीन, बिगर लागवडीखालील जमीन, वस्त्या खालील जमीन व जंगलाखालील क्षेत्र, असा जमिनीचा वापर होत आहे जमिनीच्या घटकांची विविध श्रेणींमध्ये मांडणी आणि जमिनीच्या गुणधर्मांचा सामान्यतः अभ्यास केला आहे . कळवण तालुक्यातील सुमारे ९०% लोकांचा शेती हा प्राथमिक व्यवसाय आहे. या तालुक्यातील एकूण लोकसंख्येपैकी ९०% लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेती व्यवसायात गुंतलेली आहे. सध्या तालुक्याचा विकास हा शेतीवच अवलंबून आहे. कळवण तालुका हा महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यात आहे. २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या २०८,४२२ एवढी आहे. प्रशासकीय कामांसाठी कनाशी, मोकभंगी, अभोणा आणि कळवण या चार महसूल मंडळांमध्ये विभागले गेले आहे. उंच सखल डोंगराळ भाग असून पश्चिमेस गुजरात राज्याची सीमा आहे. मुख्य व्यवसायशेती असून गिरणा, कुनद, बेहडी व तांबडी नद्यांनी सुजलाम् सुफलाम् केले आहे. येथे चणकापूर,पुनद भेगू ही धरणे असून नागली, भात, मका, गहू बरोबरच भाजीपाला यांचे उत्पादन घेतले जाते. सामाजिक वनीकरणाच्या साह्याने डोंगराळ भागात वृक्षराजी दिसून येतात. सदर अभ्यास क्षेत्रात दिवसे दिवस शेती क्षेत्रात वाढ होत असल्याने जंगल क्षेत्र कमी होत आहे

**परिचय** -

कळवण तालुक्यातील जमिनीच्या गुणधर्मांवर आधारित विविध श्रेणींमध्ये जमीन घटक यांची वेगवेगळया कामांसाठी वापरण्यात येणारी जमीन याचा वापर उदा. शेतीविषयक कामे, जंगल, पशुधन, वस्ती, रस्त्याचे बांधकाम इ.लसकास जल आहे . कळवण हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यातीळ एक तालुका आहे. एकूण लोकसंख्या कळवण, २०११ च्या जनगणनेनुसार २०८४२२ आहे. साक्षरता ५७.५२ टक्के, पुरुषांसाठी ५६.८४%आणि महिलांसाठी ४३.१६% इतकी पहावयास मिळते .

**अभ्यास क्षेत्र: -**

सदर अभ्यास क्षेत्र हे नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील आहे. अक्षवृत्तीय विस्तार २०°२९'२५''उ ते ७४°०१'३५ उ असा असून रेखावृतीय ७३° ४५ "६' पूते ७४°५५"२२' पूर्व रेखांश असा आहे. एकूण क्षेत्रफळ ८६६७०.६४ हेक्टर इतके आहे. प्रशासकीयदृष्ट्या, तहसीलने 4 मंडळे विभागली आहेत ते मोकभनगी,कनाशी, अभोणा आणि कळवण, ३५ उपविभाग असून एकूण १४१ गावांचा समावेश आहे. वायव्येस गुजरात राज्यातील डांग जिल्ह्याची सीमा असून पश्चिमकडे सुरगाणा तहसीलतर ,नैऋत्यला दिंडोरी तालुका व पूर्वेला देवळा आणि उत्तरेला बागलाण तालुका यांची सीमा आहे.




**तक्ता क्र:- २ जमीन वापर १९७१ च्या जनगणनेपासून जनगणनेत बदल १९७१,२०११**

| वर्ष | एकूण क्षेत्र हे | एकूण गावे | जंगल | | | शेती क्षेत्र | | | वस्ती /वसाहती | | | शेती योग्य नसलेली जमीन | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र | % | घट /वाढ | क्षेत्र | % | घट / वाढ | क्षेत्र | % | घट /वाढ | क्षेत्र | % | घट /वाढ |
| १९७१ | ८५२०८.४२ | १३० | ३२०६८.८ | ३७.६४ | | ४३७७७.१ | ५१.३८ | | - | -- | | ९३६२.१६ | १०.९८ | - |
| १९८१ | ८५०८०.५१ | १३२ | ३०४७४.२ | ३५.८२ | -१.८१ | ३८८५९.३१ | ४५.६७ | -५.७१ | ४०२९.९५ | ४.७४ | - | ११७१७.०५ | १३.७७ | +२.७९ |
| १९९१ | ८६६७०.६४ | १४४ | ३३०४०.२ | ३८.१३ | +२.३१ | ४१५८१.१ | ४७.९८ | +२.३१ | १४४३.६३ | १.६६ | -३.८ | १०६०४.८७ | १२.३३ | -१.५४ |
| २०११ | ८९२६७ | १५० | ३४०४४ | ३८.१३ | 0 | ४४३०६ | ४९.६३ | +१.६५ | २२०० | २.४६ | +०.८ | ८७१७ | ७.७८ | -४.४५ |

कळवण तहसीलमधील जंगलाखालील क्षेत्र १९७१ मध्ये ३७.६४ % होते मात्र या भागातील जंगल १९७१ ते १९८१ मध्ये जंगलात -१.८२ ने घट झाली. १९८१ ते१९९१ या दहा वर्षात जंगल शेत्रात २.३८ वाढ झाली आहे तर १९९१ ते २०११ या कालावधीत ० % म्हणजेच जंगम क्षेत्र स्थिर आहे. तसेच शेतीयोग्य जमीन क्षेत्राचा अभ्तास केल्यानंतर तक्ता क्र.०२ नुसार असे दिसते की १९७१ते १९८१ मध्ये -५.७१ % इतकी घट झालेली आहे .तर १९८१ ते १९९१ या कालवधीत +२.३१ % ने वाढ झाली आहे तर १९९१ ते २०११ या कालावधीत +१.६५ %वाढ झालेली आहे. तसेच वस्तीखालील 1971 ते 1981 मध्ये क्षेत्रात स्थिरता दिसत आहे .1981 ते 1991 या काळात 3.08 घट झाली दिसून येते तसेच 1996 ते 2001कालावधीमध्ये 0.8 इतकी वाढ झालेली दिसून येते.

तसेच शेतीयोग्य जमीन नसलेल्या क्षेत्रामध्ये 1971 ते 1981या वर्षात 2.79 टक्के इतकी वाढ झाली आहे. तसेच 1981 ते1991या कालखंडामध्ये 1.54 इतकी घट झाली आहे तसेच 1991 ते 2001 या कालावधीमध्ये 4.45 इतकं क्षेत्र शेती योग्य घट झाली आहे

वरील २०११ च्या आकडेवारी वरून असे लक्षात येते की शेती क्षेत्रामध्ये वाढ झाली आहे आणि जंगले ही स्थिर अवस्थेत आपल्याला दिसून येतात. याचे कारण लोकसंख्या वाढीमुळे त्यातील वसाहती खाली जमिनीचे क्षेत्रामध्ये वाढ झालेली आहे.जशी जशी लोकसंख्या वाढ झाली तसे शेती योग्य नसलेल्या जमिनीचा सुद्धा वापर वाढला आहे. त्यामुळे

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665


शेती योग्य नसलेल्या जमिनीमध्ये घट झालेली दिसून येते.या वाढत्या लोकसंख्येची काळजी घेण्यासाठी विविध पायाभूत सुविधा जसे की वस्ती, रस्ता, कार, सिंचन नेटवर्क, घरे, शाळा यात जमीन वापर झालेला दिसून येतो.


**जमीन वापरात बदल:-**

**तक्ता क्रमांक १** मध्ये कळवण तालुक्यात जमिनीचे विविध उपयोग दिसून येतात. कळवण तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र हे एकूण ८६६७०.६४ हेक्टर आहे. त्यापैकी फक्त ४१५८१.४३ हेक्टर किंवा एकूण जमिनीपैकी ४७.९८% जमीन शेतीसाठी वापरली जाते. तथापी, जंगल क्षेत्रफळ ३३०४०.७१ हेक्टर इतकेअसुन ते खालील तक्ता क्र.3 मध्ये दिलेले आहे

तक्ता-३ . कळवण तालुक्यातील जमिन वापर वितरण

| अ. न. | जमीन वापर | कनाशी | मोकभणगी | अभोणा | कळवण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जंगल | ११८१.३ | ६८३१.३९ | ७९४४.७ | ७०८३.९५ | ३३०४०.७१ |
| २ | शेती | ९७१५.९७ | १०७६२.५१ | १०६८१.०१ | १०४२१.९४ | ४१५८१.४३ |
| ३ | वसाहती | ६३७. ३६ | २५३.१२ | ७६.९१ | ४७६.२४ | १४४३.६३ |
| ४ | शेती योग्य नसलेली | २७३६.२४ | ३३००.८३ | २२६४.७ | २३०३.७४ | १०६०४.८७ |
| ५ | एकूण क्षेत्र | २४२७०.८७ | २११४७.८५ | २०९६६.०६ | २०२८५.८६ | ८६६७०.६४ |



वरील तक्त्यावरून असे दिसून येते की कळवण तहसीलच्या एकूण क्षेत्रफळापैकी १/३भाग शेतजमीन वापरामध्ये दिसून येत आहे. किमान आहे.उर्वरित तीन भागामध्ये वसाहती आणि इतर क्षेत्रात विभागली गेलेली आहे . इतर घटकांमध्ये शेती योग्य नसलेला भागाचे जास्त क्षेत्र आहे .वरील मंडळांमध्ये जंगल मध्ये सर्वात जास्त कनाशी मंडळामध्ये आहे. कृषी क्षेत्रात अभोणा या मंडळाचा तुलनेने जास्त कृषी क्षेत्र आहे. उर्वरित तीन मंडळांपेक्षा कनाशी मंडळ अधिक मागासलेले असून मोकभनगी कमी आढळते. कळवण तहसीलचा सांस्कृतिक दृष्ट्या विकसित भाग कनाशी हे तालुक्याच्या पश्चिम भागात आहे.

**जमीन वापर बदलांचे कारण आणि मीमांसा:**

१.जंगल क्षेत्रातील घट (१९७१ ते १९८१) : जंगल क्षेत्र ३७.६४% पासून ३५.८२% पर्यंत घसरले आहे. याचे कारण, शेतजमिनीच्या वाढीव उपयोगामुळे, जंगल क्षेत्र कमी झाले आहे . वाढणारी लोकसंख्या आणि शहरीकरण यामुळे जंगलाची मोकळी जागा कमी होऊन ती जागा शेतीने. वसाहतीने घेतलेली आहे.

२.शेती क्षेत्रातील घट (१९७१ ते १९८१):शेती क्षेत्र ५१.३८% पासून ४५.६७% पर्यंत कमी झाले आहे.

शहरीकरण: शहरी भागांची वाढ होऊन जमीन बांधकामांसाठी वापरली जाते,रस्ते निर्माण केले जातात. यामुळे स्शेती खालील जमीन घटत आहे

३.वस्ती / वसाहती क्षेत्रातील वाढ (१९८१ ते २०११):वस्ती क्षेत्र ४.७४% पासून २.४६% पर्यंत वाढली आहे. याचे मुख्य कारण:

शहरीकरण आणि वस्ती विस्तार: कळवण आणि आसपासच्या भागांमध्ये शहरीकरणाच्या प्रक्रियेत मोठी वाढ झाल्यामुळे, लोकसंख्या वाढली आहे, त्यासाठी वसाहतींचा विस्तार झाला आहे. विकसनशील औद्योगिकीकरण: यामुळे अधिक लोकांचे स्थलांतर झाले आणि वस्ती क्षेत्रात वाढ झाली.

४.शेती योग्य नसलेली जमीन (१९८१ ते २०११):शेती योग्य नसलेली जमीन १०.९८% पासून ७.७८% पर्यंत घटली आहे

सिंचनाच्या तंत्रज्ञानातील प्रगती: काही जमिनीत सुधारणा करून त्याचा शेतीसाठी वापर केला जातो.

जमिनांची पुनर्विकास प्रक्रिया: शहरीकरण किंवा औद्योगिकीकरणामुळे शेती योग्य नसलेल्या जमिनीचे रूपांतर इतर प्रकारच्या वापरासाठी होत आहे.

**उपाय व सुधारणा:**

- जमीन वापराच्या या विश्लेषणातून हे स्पष्ट होते की, कळवण तालुक्यातील विकास हे मुख्यतः शेती आणि शहरीकरणावर आधारित आहे. आगामी काळात अधिक शाश्वत विकास साधण्यासाठी, जंगल आणि शेती यांचा संतुलन साधणे, तसेच संसाधनांचे अधिक विवेकपूर्ण व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. नवीन तंत्रज्ञानाचा वापर: शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान, जलसंचय व सिंचन प्रणालींचा वापर करून उत्पादन क्षमता वाढवणे.
- कळवण तालुक्यातील जमीन वापराचे भौगोलिक विश्लेषण हे शेती, जलसंपत्ती, वनीकरण आणि नगरीकरण यांच्यात संतुलन राखण्यासाठी एक महत्त्वपूर्ण दृषटिकोन दर्शवते. यामुळे या तालुक्यातील शेतकऱ्यांना अधिक सक्षम बनवता येईल. आगामी काळात, अधिक शाश्वत विकास साधण्यासाठी जंगल आणि शेती यांचा संतुलन राखणे आवश्यक आहे.
- सामाजिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून, कळवण तालुक्यातील जमिनीचा अधिक टिकाऊ वापर सुनिश्चित करणे महत्वाचे आहे.

**निष्कर्ष**:

- कळवण तालुक्यातील जमीन वापरात मोठे बदल होऊन शेती क्षेत्रातील वाढ आणि जंगल क्षेत्रातील घट होत आहे .
- अभ्यास क्षेत्रात पडित जमिनीचे प्रमाण कमी होत आहे,
- अभ्यास क्षेत्रात वसाहतींचे प्रमाण वाढून शेती खालील क्षेत्रात घट होत असल्याचे दिसते.
- पडित व जंगल क्षेत्र कामियावर वाढत्या लोकसंख्येचा भारपडत असल्याने कळवण तालुक्यातील जमीन वापरावर विपरीत परिणाम होत आहे. म्हणून याकडे वेळीच लक्ष देण्याची गरज आहे. कारण या भागात राहणारे आदिवाशी बांधव घरगुती इंधन म्हणूनही जंगले तोडतात .यामुळेही जमिवापर बदल पहावयास मिळतो.

संदर्भ ग्रंथ

1. Dharam Das Vishwakarma. (2009): Agricultural development in Chhindwara district, Madhya Pradesh. The Deccan Geographer.Vol.48. No.2.pp.59-73.
2.. कृषी भूगोल Ganesh.S.Mankar (2008): Mulshi Tahsil, Pune district. The Deccan Geographer.Vol.46. No.1.pp.85-91.
3.. Jasbir Singh, S S Dhillon. (2000): Agricultural geography, Second edition.Tata McGraw-Hill Publishing Company Limited, Delhi.
४. कृषी भूगोल व Rajkumar Moharkar and Dr.J.P.Jagtap, (2009): south Solapur Tahsil of Solapur district,Maharashtra state. The Deccan Geographer.Vol.48.pp.41-47.
५. कृषी भूगोल S.D.Shinde. (1980): Agriculture in an underdeveloped region: A Geographical Survey, Himalaya publishing house. Bombay Census 2011, Nashik District